**CMA No. ८७/२०२६**
विमला व इतर वि. कोणीही नाही
**<u>MHNS020003202026</u>**

## <u>२रे सह दिवाणी न्यायाधीश, वरिष्ठ स्तर, नाशिक यांचे न्यायालयात</u>

(पिठासिन अधिकारी – रूपाली चं. नरवडिया)

**<u>दिवाणी किरकोळ अर्ज क्र. ८७/२०२६.</u>**

**<u>नि. क्र. १ खाली.</u>**

१) विमला नेमीचंदजी मुथा
वय: ८५, धंदा: गृहिणी

२) नरेंद्र नेमीचंद मुथा
वय: ६५, धंदा: व्यापार

३) वीरेंद्र नेमीचंद मुथा
वय: ६३, धंदा: व्यापार
अर्जदार क्र. १ ते ३ रा: ९/१०/११/१२ निर्मल को.ऑप.है.
सोसायटी, कान्हेरेवाडी, सी.बी.एस, ता. जिल्हा नाशिक.

४) छाया नेमीचंदजी मुथा उर्फ सौ. छाया प्रदीप जैन
वय: ६६, धंदा: गृहिणी
रा: दीपछाया आर. के. नगर, गणेश मंदिराजवळ,
धुळे रोड, तालुका अमळनेर, जिल्हा जळगाव.

५) माया नेमीचंदजी मुथा उर्फ माया कीर्तीकुमार शहा
वय: ६६, धंदा: गृहिणी
रा: १०/अ सहवास सोसायटी, कुलकर्णी कॉलनी,
शरणपूर रोड, ता. व जिल्हा नाशिक.

**अर्जदार...**

**<u>विरूध्द</u>**

कोणीही नाही. **गैरअर्जदार...**

**CMA No. ८७/२०२६**
विमला व इतर वि. कोणीही नाही
**MHNS020003202026**

.........................................................................................

**अर्जदारांतर्फे –** विद्वान विधीज्ञ श्री वी. आर. कनोजीया
**गैरअर्जदारांतर्फे –** कोणीही नाही

.........................................................................................

**अर्ज भारतीय उत्तराधिकारी कायदा १९२५ चे कलम ३७२ प्रमाणे वारसा दाखला मिळण्याकरिता**

**आदेश नि. क्र. १ वर पारीत**

(दिनांक : १६/०७/२०२६)

**०१.** सदरचा अर्ज अर्जदारांनी भारतीय वारस कायदा १९२५ चे कलम ३७२ प्रमाणे वारसा दाखला मिळण्याकरिता दाखल केलेला आहे. अर्जदारांचे असे कथन आहे की, नेमीचंदजी बेनचंदजी मुथा हे दिनांक २३/०५/२००४ रोजी मयत झालेले आहेत. मयत नेमीचंदजी बेनचंदजी मुथा यांच्या अर्जदार क्र. १ हया पत्नी आहेत तसेच, अर्जदार क्र. २ व ३ हे मुले व अर्जदार क्र. ४ व ५ हया विवाहीत मुली आहेत. वर नमुद अर्जदारां व्यतिरीक्त मयत नेमीचंदजी बेनचंदजी मुथा यांना अन्य कोणीही वारस नाहीत.

२. मयत नेमीचंदजी बेनचंदजी मुथा हे हयात असतांना त्यांनी CAPLIN POINT LABORATORIES LTD या कंपनीचे १०० शेअर्स विकत घेतले होते. त्यानुसार कंपनीने Folio No. ००१२४०५ व सर्टिफिकेट नंबर ००३६५२८ असे शेअर सर्टिफिकेट पारित केले होते. सदर शेअर्स बाबत अर्जदार यांना नोव्हेंबर २०१६ मध्ये माहिती मिळाल्यानंतर अर्जदार यांनी CAPLIN POINT LABORATORIES LTD यांना संपर्क साधला असता अर्जदार यांना समजले की, सदर शेअर्सची संख्या ५०० असुन प्रती शेअर रक्कम रु. १८५२/– अशी झालेली आहे. त्यामुळे त्यांनी CAPLIN POINT LABORATORIES LTD यांचेकडे अर्ज केला असता त्यांच्याकडे वारस दाखल्याची मागणी करण्यात आली. त्यासाठी सदरचा अर्ज अर्जदारांनी वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी दाखल केलेला आहे.

**०३.** सदर अर्जदार ईतर कोणी वारसदार आहे काय याबाबत नि. क्र. ०६ व ७ प्रमाणे जाहीरनामा व जाहिर नोटीस दिलेली आहे. परंतु ३० दिवसांची कालावधी संपुन ही कोणीही त्यावर आक्षेप घेतलेले नाही. त्यामुळे आता अर्जदार क्र. १ ते ५ यांचे शिवाय इतर कोणीही वारसदार नसल्याने त्यांना कायदेशीर वारस असल्याचा दाखला देणे योग्य होईल.

**०४.** अर्जदारांतर्फे अर्जदार क्र. १ यांनी नि. क्र. ११ लगत त्यांचे पुराव्याचे शपथपत्र दाखल केलेले आहे. अर्जदार यांनी मृत्यूप्रमाणपत्राची पडताळीत प्रत नि.क्र. १२, शेअर सर्टिफिकेटची पडताळीत प्रत नि.क्र. १३ तसेच, आधारकार्डच्या पडताळीत प्रती नि.क्र. १४ ते १८ दाखल केल्या आहेत. तसेच पुरावा बंद करण्याची पुरशीस नि. क्र. २१ वर दाखल केलेली आहे. या पुराव्याच्या आधारे प्रथमदर्शनी अर्जदार यांच्या पुराव्यास नाकारण्याचे कोणतेही कारण दिसुन येत नाही. त्यामुळे अर्जदार क्र. १ ते ५ हे मयत नेमीचंदजी बेनचंदजी मुथा यांचे कायदेशीर वारस असल्याबाबत दाखला देणे योग्य व न्यायोचित राहिल.

**०५.** अर्जदार यांनी नि.क्र. २० अन्वये पुरसीस दाखल करुन कथन केले की, अर्जदार यांनी सदरचा अर्ज दाखल केला त्यावेळी CAPLIN POINT LABORATORIES LTD यांचा मार्केट दर प्रती शेअर रक्कम रु. १८५२/– होता. परंतु, आज रोजी CAPLIN POINT LABORATORIES LTD यांचा मार्केट दर प्रती शेअर रक्कम रु. २६७१.५०/– आहे . त्यामुळे अर्जदार हे त्यानुसार न्यायालयीन मुद्रांक भरण्यास तयार आहेत. सबब, खालील आदेश पारीत करण्यात येत आहे.

## <u>आदेश</u>

**१.** अर्ज मंजुर करण्यात येतो.

**२.** अर्जदार क्र. १ ते ५ हे मयत नेमीचंदजी बेनचंदजी मुथा यांचे वारसदार असल्याने त्यांना CAPLIN POINT LABORATORIES LTD यांचे ५०० शेअर्स मिळणेबाबत उत्तराधिकार प्रमाणपत्र (succession certificate) मार्केट दर प्रती शेअर रक्कम रु. २६७१.५०/– प्रमाणे देण्यात येते.

३. अर्जदार यांनी योग्य तो न्यायालयीन मुद्रांक अदा करावा.

४. अर्जदारांनी र. रु. १३,३५,७५०/– उत्तराधिकार बंधपत्र भारतीय उत्तराधिकारी अधिनियम १९५६ चे कलम ३७२ अन्वये दाखल करावे.

NARWADIYA RUPALI CHANDRAKUMAR
Digitally signed by NARWADIYA RUPALI CHANDRAKUMAR
Date: 2026.07.16 17:56:22 +0530

दिनांक – १६/०७/२०२६.

(रुपाली चं. नरवडिया)
२रे सह दिवाणी न्यायाधीश (व.स्तर),
नाशिक